# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

अमळनेर | वर्ष १ ले | अंक : १० | बुधवार, दि. १ ऑक्टोबर २०२५ | https://epaper.globalmahatej.com/ | पाने : ४ | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com


## दिनविशेष

०१ ऑक्टोबर

- भारतात पहिले पोस्ट ऑफिस सुरू झाले.
- संगीत नाट्य गायक आणि अभिनेते जयराम शिलेदार यांनी स्वतःची मराठी रंगभूमी नाट्य संस्था स्थापन केली.
- भारतात दशमान (मेट्रिक) पद्धत वापरण्यास सुरूवात झाली.
- कार्टून नेटवर्क सुरु झाले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**

**जय भारत...!**

**जय स्वदेशी...!!**



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# मारवड- कळमसरे ४ कि.मी. रस्त्याची चाळण!

## प्रवाशांचे हाल; अपघाताचा धोका वाढला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील कळमसरे ते मारवड या अवघ्या चार किलोमीटर अंतराच्या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे अक्षरशः जीवावर बेतणारा प्रवास ठरत आहे. या मार्गाची अवस्था पाहिली, तर तो रस्ता नसून खड्ड्यांची मालिकाच झाली आहे. अवजड डंपरच्या सतत वाहतुकीमुळे रस्ता पूर्णपणे उखडला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खोलगट खड्ड्यांनी व्यापले आहे. परिणामी मोठ्या प्रमाणात अपघातांची शक्यता वाढली आहे. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यांपासून पाडळसरे धरणावर मुरूम टाकण्यासाठी खेडी येथून डंपरद्वारे वाहतूक सुरू आहे. या वाहतुकीसाठी कळमसरे- मारवड रस्त्याचा वापर होतो. पहाटेपासून ते रात्री उशिरापर्यंत सदर मार्गावरून डंपरची वाहतूक सुरूच असते. धरणासाठी मुरूम आवश्यक आहे. याबाबत ग्रामस्थांची कोणतीही हरकत नाही. मात्र, क्षमतेपेक्षा जादा मुरूम भरून अवजड वाहतूक केल्यामुळे रस्त्याची चाळण होत आहे हे गैर आहे, अशी त्यांची तक्रार आहे.

पूर्वी पाच मिनिटांत पार होणारा हा रस्ता आता वीस-पंचवीस मिनिटांचा व अपघातांना आमंत्रण देणारा आहे. या रस्त्यावरून सतत दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या अनेकांना पाठदुखीचा त्रास सुरू झाला आहे. रस्त्याची देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. या विभागाने अद्याप कोणतीही दुरुस्ती केलेली नाही. रस्ता शेतशिवाराचा वाटावा अशी अवस्था झाली आहे. बांधकाम विभागाने जबाबदारी झटकून बघ्याची भूमिका घेतली आहे, अशी ओरड ग्रामस्थांकडून होत आहे. दैनंदिन गरजांसाठी हा मार्ग वापरणाऱ्या नागरिकांचा संताप शिगेला पोहोचला आहे. रस्त्याची कमालीची दुर्दशा व त्यामुळे अपघातांची असलेली मोठी शक्यता याकडे संबंधित सारेच दुर्लक्ष करीत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. डंपर वाहतुकीवर नियंत्रण ठेवून या मार्गाचे दर्जेदार पद्धतीने काम करावे, अशी मागणी कळमसरे व परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## जळगाव- पुणे विमान प्रवासासाठी महिनाभराआधीच तिकिट बुकिंग सुरू

**अमळनेर** : जळगाव विमानतळावरून विमानसेवा सुरू झाली आहे. जळगाव- पुणे विमानसेवेला पसंती मिळत आहे. तिकिटाचे दरही वाढले आहेत. महिनाभरापूर्वीच तिकिट बुकिंग जोमात आहे. दिवाळीच्या काळात पुण्याहून जळगावला येणाऱ्या व जाणाऱ्यांची प्रवाशांची मोठी गर्दी असते. परिणामी या काळात ट्रॅव्हल्सचे तिकिटाचे दर वाढत असतात. आठवडाभर पुणे सेवा असल्याने प्रवाशांकडून सुटीचे नियोजन करण्यात येते. वेळ वाचविण्यासाठी महिनाभराअगोदरच येण्यासाठी व जाण्यासाठी विमानाचे तिकिट बुकिंग सुरू झाले आहे. गोवा- जळगाव- पुणे- हैदराबाद सेवा गोव्याच्या विमान कंपनीकडून सुरू करण्यात आली आहे.

## मंगलेश्वरी भूमीमाता : महागौरी कुंकूमार्चन




**श्री मंगळग्रह मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्ताने महागौरी कुंकूमार्चन देवीच्या स्वरूपात सजविलेली श्री मंगळेश्वरी भूमीमाता.**

(छायाचित्र : नितेश बारी)

## अमळनेर- धरणगाव रस्त्यावर दुचाकी अपघातात महिलेचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**अमळनेर** : दुचाकी अपघातात एक महिला ठार, तर त्यांचे पती गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना अमळनेर- धरणगाव रस्त्यावरील बुलडाणा अर्बनच्या वेअर हाऊस समोर मंगळवारी दुपारी घडली. धुळे रोडवरील आर. के. नगर येथील रहिवासी मधुकर ठाकरे हे त्यांच्या पत्नी मंगला ठाकरे यांच्यासोबत दुचाकीने जात होते. रस्त्यात मोकाट सुटलेल्या म्हशीमुळे त्यांची दुचाकी नियंत्रणाबाहेर गेली. या अपघातात महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

त्यांचे पती मधुकर ठाकरे यात गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी खासगी रूग्णालया दाखल करण्यात आले आहे. हे दांपत्य अत्यंत मनमिळावू होते. त्यांच्या अपघाताची माहिती कळताच त्यांच्या आप्तेष्टांनी रूग्णालयात गर्दी केली. महिलेच्या मृत्यूने अमळनेरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शरद सोनवणे यांना पुत्रशोक

## युवावस्थेतील परेशच्या निधनाने सर्वत्र हळहळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सिद्धिविनायक कॉलनीतील रहिवासी परेश शरद सोनवणे (वय ३४, मूळ गाव हातेड) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने धुळे येथे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवारी (ता. १ ऑक्टोबर) सकाळी नऊला सिद्धिविनायक कॉलनीमधील राहात्या घरापासून निघणार आहे. परेश हा ख्यातनाम गायक व सामाजिक कार्यकर्ते



शरद सोनवणे यांचा मुलगा होता. तो उत्कृष्ट क्रिकेटपटू होता. अनेकांना तो क्रिकेटचे प्रशिक्षण देत असे. मराठा मंगल कार्यालयाजवळील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये त्याचे जीवनावश्यक वस्तूंचे दुकान होते. अत्यंत हसतमुख व सहकार्यशिल असल्याने त्याचा खूप मोठा मित्र परिवार आहे. परेशच्या अकाली निधनाने त्याच्या परिवारासह मित्र परिवाराला खूप मोठा भावनिक धक्का बसला आहे. परिसरातही सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, परेशच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई- वडील व बहीण आहे. परेशची बहीण अमेरीकेला स्थायिक आहे. परेशबाबतचे दुर्दैवी वृत्त कळताच ती तातडीने अमेरीकेवरून निघाली आहे. सोनवणे परिवाराच्या सांत्वनासाठी सर्व स्तरातील नागरिकांची मोठी रीघ लागली होती.

# शासनाच्या बदलत्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## माजी आमदार कृषिभूषण पाटलांनी मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**अमळनेर** : नैसर्गिक आपत्तीमुळे मार्च २०१४ ते सप्टेंबर २०२५ अखेर बाधित शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले होते. मात्र, शासनाच्या बदलत्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. याचा तुलनात्मक अहवाल तयार करून त्यांनी शेतकऱ्यांवर कसा अन्याय होत आहे, हे निदर्शनास आणून देणारे निवेदनात्मक पत्र येथील माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

कृषिभूषण पाटील यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे, की शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होत आहे. नुकसानीपोटी बाधितांना शासनाकडून मार्च २०१४मध्ये जिरायत शेतीसाठी दोन हेक्टरी १० हजार रुपये, मार्च २०२३ मध्ये ८ हजार ५००, जानेवारी २०२४ मध्ये तीन हेक्टरला १३ हजार ६०० तर मे २०२५ मध्ये ८ हजार ५००. बागायती शेतीसाठी दोन हेक्टरला १५ हजार रूपये, मार्च २०२३ मध्ये १७ हजार, जानेवारी २०२४ मध्ये तीन हेक्टरला २७ हजार व मे २०२५ मध्ये १७ हजार रुपये. तर बहुवार्षिक फळपिकांसाठी दोन हेक्टरला २५ हजार रूपये, मार्च २०२३ मध्ये २२ हजार ५००, जानेवारी २०२४ मध्ये तीन हेक्टरला ३६ हजार, तर मे २०२५ मध्ये २२ हजार ५०० रूपये जाहीर केले होते.

या माहितीनुसार बाधित शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात दिलेल्या मदतीची तुलनात्मक विचार व्हावा. तत्कालीन आघाडी शासनाने शासन निर्णय दि. २० मार्च २०२४

**पान ३ वर...**

# महानवमीला पाच दुर्मिळ राजयोग!

## ऑक्टोबरच्या प्रारंभीच तीन राशींच्या नशिबी पैशासह श्रीमंती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महानवमीचा सण यंदा बुधवार, दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी साजरा होणार आहे. या दिवशी पाच खास संयोग होत आहेत. त्यामुळे काही राशींचे नशीब उजळण्याची शक्यता आहे. त्या राशींना अचानक धनलाभ होण्यासह प्रगतीची संधी मिळू शकते. वैदिक शास्त्रानुसार सण-उत्सवांदरम्यान अनेक योग आणि राजयोग तयार होत असतात. त्याचाच परिणाम माणसाच्या जीवनावर तसेच देश-विदेशावर दिसतो.



महानवमीला **सूर्य - बुध** युतीमुळे बुधादित्य योग तयार होत आहे. त्याचबरोबर बुध स्वतःच्या राशीत असल्याने भद्र महापुरूष राजयोग तयार होत आहे. सूर्य - यम युतीमुळे नवपंचम योग आणि शुक्र - गुरू युतीमुळे अर्धकेंद्र योग होत आहे. तसेच रवी योगही होत आहे. त्यामुळे काही राशींचे नशीब उजळून निघू शकते. त्यात सिंह, कन्या व मकर या राशींचा समावेश आहे.

**सिंह** : या राशीच्या लोकांना पाच ग्रहांचा खास योग फायदेशीर ठरू शकतो. कारण भद्र आणि बुधादित्य राजयोग संबंधित राशीच्या धन भावात होत आहेत. त्यामुळे या काळात वेळोवेळी या राशीच्या लोकांना लाभ होऊ शकतो. उत्पन्नाचे नवे मार्ग तयार होऊ शकतात. आत्मविश्वास वाढेल. पैशांशी संबंधित अडचणी दूर होऊ शकतात. गुंतवणुकीसाठी हा योग्य काळ आहे.

**कन्या** : पाच ग्रहांचा खास संयोग या राशीच्या लोकांसाठी शुभ ठरू शकतो. कारण भद्र आणि बुधादित्य राजयोग या राशीच्या लग्न भावात होत आहे. त्यामुळे या काळात सदर राशीच्या लोकांच्या काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. मान-सन्मान, प्रतिष्ठा मिळेल. नोकरी करणाऱ्यांना पदोन्नती मिळेल किंवा गौरव होऊ शकतो. विद्यार्थ्यांसाठीही महानवमी शुभ असेल. अभ्यासात यश मिळविण्याचे योग आहेत. विवाहितांचे वैवाहिक जीवन आनंदी राहील. तसेच अविवाहितांना विवाहाचा प्रस्ताव येऊ शकतो.

**मकर** : या राशीच्या लोकांसाठी पाच ग्रहांचे खास संयोग फायदेशीर ठरू शकतात. कारण भद्र आणि बुधादित्य राजयोग या राशीच्या नवव्या भावात येत आहेत. त्यामुळे या काळात या राशीच्या लोकांना नशिबाची साथ मिळू शकते. अडकलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे. व्यापाऱ्यांसाठी हा काळ खूप फायदेशीर ठरेल. कुटुंबासोबत वेळ घालविण्याची भरपूर संधी मिळेल. या काळात एखादी महाग वस्तू खरेदी करू शकता. (**सदर माहिती ज्योतिषशास्त्रावर आधारित आहे.**)


ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# नाना पाटेकरांसह मकरंद अनासपुरेंना समाजभान

## मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी ‘ नाम फाउंडेशन ’कडून मदत जाहीर

महाराष्ट्रातील मराठवाडा आणि सोलापूरसह अनेक जिल्ह्यांवर आलेल्या प्रलयंकारी पुराने संपूर्ण राज्याला हादरवले आहे. आठवडाभरापासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे धाराशिव (पूर्वीचे उस्मानाबाद), बीड, लातूर, सोलापूरसह ३० जिल्ह्यांतील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नद्या-नाल्यांच्या पूरसमान पाण्याने शेतकऱ्यांची पिके, फळबागा, पशुधन आणि घरे उद्ध्वस्त झाली आहेत. जवळपास ५० लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले असून, जीवितहानी आणि मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. संकटकाळात राज्य सरकार आणि विविध संस्था मदतीसाठी पुढे येत आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरेंनीही समाजभान दाखविले आहे. त्यांच्या ‘ नाम फाउंडेशन’मार्फत पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर करण्यात आली आहे. जनतेसाठीही मदतीचे आवाहन केले आहे.

**मराठवाड्यावर कोसळलेले संकट**

मराठवाड्यातील ही नैसर्गिक आपत्ती यापूर्वी तेथील लोकांनी कधीही अनुभवलेली नाही. मकरंद अनासपुरेंनी याबाबतच्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे, की मराठवाड्याने कधीही असा पाऊस अनुभवला नाही. पावसाने केलेल्या कहरामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनींत पाणी शिरले आहे. धान्य, फळे आणि भाजीपाला नष्ट झाला आहे. याशिवाय, गायी-म्हशी, बैल आणि शेळ्या यांसारखे पशुधनही पुरात वाहून गेले आहे. अनेक गावांतील घरे, रस्ते आणि वीजपुरवठा खराब झाला आहे. हजारो लोक अस्थायी छावण्यांमध्ये राहत आहेत. राज्य सरकारने मदत जाहीर केली असली, तरी शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन पुनर्वसनासाठी सामाजिक संस्थांचे योगदान महत्त्वाचे ठरते.



### ‘ नाम फाउंडेशन ’ची मदत

नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरेंनी २०१५ मध्ये स्थापन केलेले ‘ नाम फाउंडेशन ’ ही सेवाभावी संस्था शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी समर्पित आहे. दुष्काळग्रस्त मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पाणलोट प्रकल्प, शेती सल्ला, शिक्षण आणि आर्थिक मदत यांसारखे उपक्रम राबविणारी ही संस्था आता पूरग्रस्तांसाठीही सक्रिय झाली आहे. फाउंडेशनच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये दोन्ही कलाकारांनी पूरग्रस्तांसाठी मदत जाहीर केली आहे. व्हिडिओत नाना पाटेकर म्हणतात, की या पुरात ३० जिल्हे बाधित आहेत. मराठवाडा आणि सोलापूर या भागांवर अधिक परिणाम झाला आहे. यातून झालेले नुकसान न भरून येणारे आहे. सरकार मदत करतच आहे. परंतु आपणही आपल्या परीने काही तरी करूया. ‘ नाम ’च्या मदतीने जेवढे करता येईल तेवढे करूया. आपण शेतकऱ्यांवर उपकार करत नाही. त्यांच्या संकटात साथ देत आहोत. मकरंद अनासपुरे पुढे सांगतात, की या पुरामुळे ५० लाख हेक्टर पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. जीवितहानी, पशुधनाचे नुकसान आणि घरे उद्ध्वस्त झाली आहेत. सर्व दानशूर व्यक्तींना आवाहन आहे, की बळीराजा आणि सामान्य लोकांना मदत करूया. कुणीही खचून जाऊ नये किंवा अविचार करू नये. मदतीला सुरुवात झाली आहे. पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना उभारी मिळेल आणि ते पुन्हा नव्याने उभे राहतील, यासाठी आपण एकत्र येऊया. ‘ नाम फाउंडेशन ’ने पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी अन्नधान्य, कपडे, वैद्यकीय मदत आणि आर्थिक सहाय्याची घोषणा केली आहे.

### जनतेचे कौतुक अन् एकत्र येण्याची वेळ

या व्हिडिओखाली अनेकांनी नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरेंच्या या पुढाकाराचे कौतुक केले आहे. सोशल मीडियावर असे हॅशटॅग ट्रेंड करत आहेत. हे दृश्य समाजातील एकजुटीचे प्रतीक आहे. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी छोट्या-मोठ्या दानांद्वारे प्रत्येकजण योगदान देऊ शकतो. ‘ नाम फाउंडेशन ’सारख्या संस्था शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन सक्षमीकरणासाठी काम करतात. ज्यामुळे अशा संकटांमध्येही आशेचा किरण दिसतो. या कठीण काळात सर्व मराठी बांधवांनी एकत्र येऊन पूरग्रस्तांना आधार द्यावा. अधिक माहितीसाठी ‘नाम फाउंडेशन’च्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

## हे आपणास माहित आहे काय?

१. मुंग्या कधीच झोपत नाहीत. २. मुंग्यांना फुफ्फुसे नसतात. ३. सर्वांत महाग मसाला केशर आहे. ४. खेकड्यांचे रक्त निळे असते. ५. ऑक्टोपसला तीन हृदय असतात. ६. घोडे उभे राहूनसुद्धा झोपू शकतात. ८. जगात सर्वाधिक खाल्ले जाणारे फळ म्हणजे टोमॅटो. ९. नॉर्वेमध्ये दरवर्षी सहा महिने सूर्य मावळत नाही. १०. स्लॉथ एक मिनिटात फक्त ४ मीटर चालतो. ११. गांडुळाला एक मोठे हृदय नसून ५ छोटी-छोटी हृदय असतात. १२. जगात सर्वाधिक खाल्ला जाणारा भाजीपाला म्हणजे बटाटा. १३. चॉकलेट कुत्र्यांसाठी विषारी असते. १४. मध हजारो वर्षं सुद्धा खराब होत नाही. १५. डॉल्फिन एक डोळा उघडा ठेवून झोपतात. १६. जगातील सर्वांत वेगवान इंटरनेट सिंगापूरमध्ये आहे. १७. जगातील सर्वांत जुनी ज्ञात भाषा म्हणजे संस्कृत.



## कानपूर-दिल्ली विमानात उंदीर; उड्डाणास तीन तास विलंब

कानपूर विमानतळावर सोमवारी (२९ सप्टेंबर) इंडिगोच्या विमानात उंदीर सापडल्याने प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला. त्यामुळे उड्डाण तब्बल तीन तास उशिरा झाले. दिल्लीहून दुपारी २.१० वाजता कानपूरला उतरलेल्या या विमानाचे दुपारी २.५० वाजता दिल्लीकडे उड्डाण होणार होते. मात्र, एका उंदरामुळे हे उड्डाण सायंकाळी ५.३० वाजता झाले.

विमानतळावरील नियमित तपासणी आणि स्वच्छता प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना विमानात प्रवेश देण्यात आला. मात्र याचवेळी एका क्रू मेंबरला विमानात उंदीर दिसला. ही माहिती तत्काळ विमानतळ आणि इंडिगो प्रशासनाला कळविण्यात आली. प्रवाशांचा त्रास टाळण्यासाठी त्यांना विमानातून खाली उतरवून विमानतळावर प्रतीक्षा करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी विमानात ‘ शोधमोहीम ’ राबविली आणि तब्बल दीड तासांच्या प्रयत्नानंतर उंदीराला बाहेर काढण्यात यश आले.





## खोटे बोलणारा व्यक्ती कसा ओळखाल?

काही लोक इतक्या आत्मविश्वासाने खोटे बोलतात, की समोरच्याला शंकाही येत नाही. पण खोटे बोलणाऱ्यांचे काही हावभाव आणि वागणे त्यांना पकडून देते. खालील ५ गोष्टींवरून तुम्ही एका सेकंदात ओळखू शकाल, की समोरचा खोटे बोलतोय का ?

**नजर चुकवणे :** खरे बोलणारी व्यक्ती तुमच्याकडे बघून, नजरेला नजर भिडवून बोलते. पण खोटे बोलणारा डोळ्यांचा संपर्क टाळतो. त्याची नजर इकडे-तिकडे भटकते. जर कोणी तुमच्याकडे बघायला टाळाटाळ करत असेल, तर कदाचित तो काहीतरी लपवतोय.

**अस्वस्थ वागणे :** खोटे बोलताना मनात अपराधीपणाची भावना किंवा तणाव असतो. यामुळे व्यक्ती नकळत पाय हलवते, बोटे चोळते, केसांना सतत हात लावते. अशा अस्वस्थ हालचाली दिसल्या तर समजून जा, काहीतरी गडबड आहे.

**जास्तीचा तपशील सांगणे :** खोटे बोलणारी व्यक्ती त्यांनी सांगितलेले खोटे समोरच्याला खरे वाटावे म्हणून गरजेपेक्षा जास्त बोलतात. ते अनावश्यक तपशील देतात. त्यांच्या बोलण्यात विसंगती असते. जर कोणी खूपच जास्त बारीकसारीक गोष्टी सांगत असेल, तर तो काहीतरी लपवत असण्याची शक्यता आहे.

**उत्तर देण्यास उशीर :** खरे बोलणारे लगेच आणि सहज उत्तर देतात. पण खोटे बोलणारे आधी गोष्टी रचतात. त्यावर विचार करतात. त्यामुळे त्याचं उत्तर यायला उशीर होतो. ही बाब निश्चितच संशयास्पद असते.

**बनावट हसणे :** खरे हसणे सहज ओळखले जाते. तसेच खोटे हसणेही लगेच लक्षात येते. खोटे हसणाऱ्याच्या चेहऱ्यावर तणाव किंवा अपराधीपणाचे भाव दिसतात. जर कोणी ओढून-ताणून हसत असेल, तर तो खोटे बोलत आहे असे समजण्यास हरकत नाही.

## मिठातील भेसळ ओळखण्याचा सोपा अन् अनोखा किचन जुगाड

मीठ हा प्रत्येक स्वयंपाकघरातील अत्यावश्यक घटक आहे. ते जेवणाला चव तर देतेच शिवाय आपल्या शरीरासाठी सोडियमचा मुख्य स्रोत आहे. मात्र आजकाल बाजारात मिठात भेसळ होण्याचे प्रमाण वाढले आहे. भेसळयुक्त मीठ आरोग्यासाठी घातक ठरते. कारण त्यात घातक रसायने मिसळली जाऊ शकतात.

भेसळयुक्त मीठ खाल्ल्याने पोटाचे विकार, उच्च रक्तदाब किंवा इतर आरोग्य समस्या उदभवू शकतात.

अशा परिस्थितीत खरे आणि भेसळयुक्त मीठ ओळखणे महत्त्वाचे आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये एका गृहिणीने मिठातील भेसळ तपासण्याचा साधा आणि प्रभावी जुगाड शेअर केला आहे. हा लेख त्या जुगाडाची माहिती सुधारित आणि स्पष्ट स्वरूपात सादर करतो.

जुगाड नेमका काय आहे?

व्हायरल व्हिडिओमध्ये एका गृहिणीने मिठातील भेसळ तपासण्यासाठी लाटण्याचा (बेलन) आणि पाण्याचा वापर केला आहे. ही पद्धत अशी :

साहित्य : एक ताट, लाटणे, एक कप पाणी, चमचा आणि तपासायचे मीठ.

पद्धत : ताटात लाटणे ठेवा. एका कपात पाणी घेऊन त्यात चमच्याने थोडे मीठ मिसळा. हे मिठाचे पाणी लाटण्यावर ओता. ताटात पडलेले मिठाचे कण (जर असतील तर) उचलून लाटण्यावर टाका.

**परिणाम :** खरे मीठ पाण्यात पूर्णपणे विरघळते. त्यामुळे लाटण्यावर मिठाचे कण दिसणार नाहीत. जर लाटण्यावर मिठाचे कण शिल्लक राहिले किंवा पाणी पूर्णपणे स्वच्छ दिसत नसेल (उदा.- गढूळ), तर ते मीठ भेसळयुक्त असण्याची शक्यता आहे.

**इतर पद्धती :** मिठात भेसळ आहे का हे तपासण्यासाठी आणखी एक सोपी पद्धत आहे. थोडे मीठ पाण्यात टाकून ढवळा. खरे मीठ पूर्णपणे विरघळेल, तर भेसळयुक्त मिठामुळे पाणी गढूळ होऊ शकते.

### खरेदी टिप्स :

विश्वासार्ह ब्रँडचे आणि FSSAI मान्यताप्राप्त मीठ खरेदी करा. आयोडिनयुक्त मीठ वापरणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. हा किचन जुगाड मिठातील भेसळ ओळखण्यासाठी उपयुक्त आणि सोपा मार्ग आहे. तरीही मिठाची शुद्धता सुनिश्चितीसाठी वैज्ञानिक चाचणी आणि विश्वासार्ह ब्रँडची निवड हा उत्तम पर्याय आहे.



### भेसळीचे धोके

आजकाल मिठात चुना, वाळू किंवा इतर हानिकारक रसायने मिसळली जातात. ही भेसळ ओळखण्यासाठी बाजारात उपलब्ध मिठाच्या पॅकेटवर FSSAI प्रमाणपत्र तपासणेही महत्त्वाचे आहे. तसेच मिठाची चव, रंग आणि पोत यावरूनही प्राथमिक अंदाज बांधता येऊ शकतो. उदा.- खूप पांढरे किंवा असामान्य चमकणारे मीठ भेसळयुक्त असण्याची शक्यता असते.

## पीएम मोदी की नवरात्रि व्रत दिनचर्या सख्त अनुशासन और सादगी भरा आहार



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अपनी अनुशासित जीवनशैली और पारंपरिक प्रथाओं के पालन के लिए जाने जाते हैं। अमेरिकी पॉडकास्टर लेक्स फ्रिडमैन के साथ बातचीत में पीएम मोदी ने अपनी व्रत की दिनचर्या, खासकर नवरात्रि के दौरान, के बारे में बताया। १७ सितंबर २०२५ को ७५ वर्ष के होने पर उन्होंने खुलासा किया कि व्रत उनकी इंद्रियों को असाधारण रूप से सक्रिय और मानसिक स्पष्टता को बढ़ाता है।जब उनसे पूछा गया कि वे व्रत क्यों करते हैं और इस दौरान उनका मन कहां जाता है, तो पीएम मोदी ने कहा कि व्रत के दौरान उनकी इंद्रियांसूंघने, स्पर्श और स्वाद की क्षमताअसाधारण रूप से तेज हो जाती हैं। आप पानी की खुशबू तक महसूस कर सकते हैं। अगर कोई पास से चाय लेकर गुजरे, तो उसकी सुगंध तुरंत पता चलती है। पहले देखा हुआ छोटा सा फूल भी व्रत के दौरान नया-सा लगता है, उन्होंने बताया। उन्होंने कहा कि यह बढ़ी हुई जागरूकता उनकी सोच को तीक्ष्ण बनाती है. नवीन विचारों को जन्म देती है और उन्हें रूढ़ियों से परे सोचने में मदद करती है।



### नवरात्रि व्रत के नियम

नवरात्रि के नौ दिनों तक पीएम मोदी सख्त नियमों का पालन करते हैं। केवल गर्म पानी पीते हैं। अन्न का सेवन पूरी तरह बंद रखते हैं। उन्होंने बताया कि गर्म पानी पीना उनकी दिनचर्या का अभिन्न हिस्सा रहा है। समय के साथ उनकी जीवनशैली इसके अनुरूप ढल गई है। यह व्रत न केवल शरीर को शुद्ध करता है। बल्कि मानसिक संतुलन और आत्मसंयम को भी मजबूत करता है।

### चातुर्मास और चैत्र नवरात्रि

पीएम मोदी प्राचीन भारतीय परंपरा के अनुसार चातुर्मास का पालन करते हैं। जो मध्य जून से लेकर दिवाली के बाद तक चलने वाला चार महीने का व्रत काल है। इस दौरान वे २४ घंटे में केवल एक बार भोजन करते हैं। उन्होंने बताया कि यह परंपरा शरीर को शुद्ध करने के साथ-साथ आत्मिक शांति भी प्रदान करती है। चैत्र नवरात्रि (मार्च-अप्रैल) के दौरान वे एक विशेष प्रकार का व्रत रखते हैं, जिसमें वे पूरे नौ दिनों तक केवल एक ही फल खाते हैं। उन्होने कहा की , ‘ अगर मैंने पपीता चुना , तो पूरे नौ दिन सिर्फ पपीता ही खाता हूं। यह सादगीपूर्ण और अनुशासित आहार न केवल शरीर को हल्का रखता है , बल्कि मन को स्थिर और स्पष्ट भी बनाता है।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून

## शासनाच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

अन्वये विशेष बाब म्हणून पॅकेज जाहीर केले होते. याच धर्तीवर महायुती शासनाने शासन निर्णय १ जानेवारी २०२४ अन्वये आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर अनुदान प्रदान केले होते. तथापि महायुती शासन सत्तेवर असताना शासन निर्णय दि. १ मे २०२५, दि. १ जानेवारी २०२४ अन्वये सूचना केल्या होत्या. यानुसार दोन हेक्टर क्षेत्राऐवजी ३ हेक्टर व अनुदान तीन पटीने वाढीव अधिक्रमित करण्यात आलेल्या नाहीत. खरीप २०२५ व पुढील कालावधीकरिता केंद्र व राज्य शासनाने अधिसूचित केल्या. यात नुकसानिकरीता द्यावयाचे निविष्ठा अनुदानाचे दर व निकष शासन निर्णय दि. २७ मार्च २०२३ प्रमाणे देय राहतील, असे नमूद केले. आहे. या अन्यकारक निर्णयातील तुटपुंज्या मदतीमुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये शासनाविरूद्ध संतप्त भावना आहे.

शासन निर्णय दि. ३० मे २०२५ नुसार खरीप २०२५ पासून विविध जिल्ह्यात अतिवृष्टी, पूर परिस्थिती उद्भवली. यात झालेल्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदतीबाबत शासन निर्णय १ जानेवारी २०२४ अन्वये सूचना अधिक्रमित केल्या. शासन निर्णय दि. २७ मार्च २०२३ प्रमाणे देय राहतील. जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीतील बाधीतांना शासन निर्णय दि. २३ सप्टेंबर २०२५ नुसार दोन हेक्टर मर्यादित आहे. जिरायत शेतीसाठी ८ हजार ५०० व बागायतसाठी १७ हजार आणि बहुवार्षिक फळ पिकासाठी २२ हजार ५०० रूपये आहे. ही मदत तुटपुंजी असल्याने १ जानेवारी २०२४ शासन निर्णयानुसार नुसार निकष लावावेत. सरसकट अतिरिक्त अनुदान स्वरूपात प्रदान करण्यात यावे, असेही कृषीभूषण पाटील यांनी पत्रात म्हटले आहे. या पत्राच्या प्रती मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री, मदत पुनर्वसन मंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.



## मुस्लीम नेत्यांचा 'राष्ट्रवादी'त प्रवेश

### अनिलदादा पाटील यांच्याकडून स्वागत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेशाचा ओघ सातत्याने सुरूच आहे. नुकताच मुस्लीम समाजाच्या अनेक नेत्यांनीही प्रवेश केला आहे. आमदार अनिलदादा पाटील यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले आहे.

गेल्याच आठवड्यात मुस्लीम समाजातील काही माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते प्रवेश झाला होता. त्यानंतर पुन्हा ज्येष्ठ मुस्लीम नेते, माजी नगरसेवक तथा काँगेसच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. यात प्रामुख्याने काँग्रेस नेते आमीरखा मिस्तरी, हाजी दबिरखा पठाण, माजी नगरसेवक रहेमान मेंबर, निवृत्त नायब तहसीलदार साबीर खान पठाण, तौसिफ हाजी शेखा, जफर मण्यार, साबीर पठाण, कादीर खाँ. पठाण, फरदीन खाँ. आदींनी प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, जिल्हा उपाध्यक्ष इम्रान खाटीक, आरीफ पठाण, सय्यद आबीद अली, कलीम शेख, इम्रान शेख आदी उपस्थित होते. आमदार पाटील यांनी यावेळी शहराचा विकास व मुस्लीम समाजबांधवांच्या हितासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

# समाजात बदल घडविण्यासाठी राज्यशास्त्र विषय अत्यावश्यक

### सीए नीरज अग्रवाल : प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात स्वागत समारंभ



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यशास्त्र हा विषय सखोल अभ्यासाचा आहे. सध्या या विषयाची मागणी झपाट्याने वाढत आहे. सार्वजनिक धोरणांच्या विश्लेषणासाठी राज्यशास्त्र महत्वाचे मानले जाते. समाजात बदल घडविण्यासाठी हा विषय अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन खानदेश शिक्षण मंडळाचे कार्योपाध्यक्ष सीए नीरज अग्रवाल यांनी केले.

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयांतर्गत प्रताप तत्वज्ञान केंद्रात सोमवारी झालेल्या राज्यशास्त्र विभागाच्या स्वागत समारंभप्रसंगी विशेष अतिथी म्हणून ते बोलत होते. प्रताप तत्वज्ञान केंद्राचे मानद संचालक डॉ. एस. डी. ओसवाल, पदार्थ विज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. जयंत पटवर्धन, प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. धीरज वैष्णव, सिनेट सदस्य डॉ. संदीप नेरकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

नीरज अग्रवाल पुढे म्हणाले, की राजकीय पक्षांना सल्ला देणे, सर्वेक्षण करणे हे राज्यशास्त्रातून शिकावयास मिळते. विविध माध्यमातून हा विषय समाजाला दिशा दाखवतो. विद्यार्थ्यांनी या विषयाचा अभ्यास करून समाजपयोगी संशोधन करावे. यातून चांगली कारकीर्द घडवण्याची संधी आहे. डॉ. एस. डी. ओसवाल यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार दोन पदव्या घेण्याची विद्यार्थ्यांना संधी आहे. डॉ. जयंत पटवर्धन यांनी नैतिकता, चारित्र्य व एकतेच्या मूल्यांचे जीवनातील असलेले महत्त्व सांगितले. डॉ. धीरज वैष्णव यांनी प्रताप तत्वज्ञान केंद्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. विद्यार्थ्यांनी तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांचा अभ्यास करावा, असे आवाहनही त्यांनी केले. प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांनी राज्यशास्त्र हा विषय समाज व राष्ट्रनिर्मितीसाठी महत्त्वाचा असल्याचे सांगितले. डॉ. विजय तुंटे यांनी अध्यक्षीय भाषणात राज्यशास्त्र, राजकारण आणि करिअर हे तीन घटक परस्परपूरक आहेत. विद्यार्थ्यांनी यांचा अभ्यास केल्यास करिअर घडवण्यासाठी नवे मार्ग खुलतील असे सांगितले.


प्रारंभी कर्मवीर दानशूर प्रताप शेठजी, पूज्य साने गुरुजी आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कावेरी भोई आणि डॉ. हर्ष नेतकर यांनी स्वागतगीत सादर केले. आफ्रिन पठाण व रमा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. रवीना नरवाडे यांनी आभार मानले. डॉ. सौ. राधिका पाठक, करिअर काउन्सेलिंग सेंटरचे दिलीप शिरसाठ, पराग पाटील, विशाल अहिरे, अतुल धनगर, प्रा. अमोल अहिरे, राज्यशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

कार्यक्रमप्रसंगी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात आफ्रिन पठाण, साक्षी पाटील, मयुरी पाटील, गायत्री पाटील, भाग्यश्री पाटील, दानेश सोनार, रोहिणी पाटील, पल्लवी पाटील, शुद्धोधन बागुल, स्वप्नील अमृतकर व निर्भय सोनार यांचा समावेश होता.

## नाथपंथी समाजाच्या उत्तर महाराष्ट्र महिला अध्यक्षपदी सौ. शिंदेंची निवड

**ग्लोबल महोतेज वृत्तसेवा**



अमळनेर : अखिल भारतीय नाथपंथी समाजाच्या उत्तर महाराष्ट्र महिला अध्यक्षापदी अमळनेर येथील सौ. शोभा रघुनाथ शिंदे यांची नुकतीच निवड करण्यात आली. गुरूगोरक्षनाथ आर्थिक विकास महामंडळाची नुकतीच स्थापना झाली आहे. नाथपंथी समाजाला न्याय मिळवून दिल्याने नवी मुंबई येथे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघातर्फे वनमंत्री गणेशजी नाईक यांचा कृतज्ञता सोहळा पार पडला. या सोहळ्यात सौ. शोभा शिंदे यांची निवड करण्यात आली. महासंघाचे सचिव योगेशजी बर्वे, अनिल कानडे, बालकनाथ वरपे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी सौ. कलावती वरपे, ज्ञानेश्वर लाड, बाळकृष्ण जाधव आदी उपस्थित होते. या निवडीबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयाजी नाथ व राज्य समितीचा सौ. शिंदे यांनी ऋणनिर्देश केला आहे.



## विनम्र आवाहन

नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील घट, आरास, पूजा–विधींची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी त्यांचे फोटो तसेच नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील काही पारंपारिक, दीर्घकालीन प्रथा, व्रत–वैकल्ये, उपक्रम आदींचीही माहिती आम्हांस या **7711004040** व **7711004242** क्रमांकावर पाठवा.

*संपादक, दै. ग्लोबल महातेज*

## डिजिटल पत्राने कृपया अवश्य अभिप्राय द्या

एकेकाळी पोस्टल पत्रांचा प्रचंड बोलबाला होता. भावभावनांचे, निमंत्रणांचे, सुख- दुःखाच्या वार्तांचे, सर्व प्रकारच्या व्यवहारांची देवाण–घेवाण शक्यतो पोस्टल पत्रानेच होत होती ." माझ्या मामाचे पत्र हरवले " असे म्हणत बालपणाचा आनंद आणि सुखद अनुभव आपण सर्वांनीच घेतला आहे. आता मात्र ते मामाचे पत्र जणू कायमचेच हरवले आहे. या पार्श्वभूमीवरही आपण डिजिटल पत्राने अर्थात व्हॉट्सअॅपने ग्लोबल महातेज मधील बातम्या व लेख यासंदर्भातील अभिप्राय कृपया अवश्य पाठवा. आमच्यासाठी ते मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल.

धन्यवाद .

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

## दिनेश येवले यांनी घडविले प्रामाणिकपणाचे दर्शन

### सापडलेली मुदतठेव पावती केली हिंगोणेच्या ग्रामस्थाला परत

**ग्लोबल महोतेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तहसील कार्यालयात कामानिमित्त आलेल्या तालुक्यातील हिंगोणा येथील एका ग्रामस्थाची मुदतठेवीची पावती हरवली होती. ही पावती दिनेश येवले यांना सापडली होती. ती पावती त्यांनी त्यांना परत केली आहे. त्यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हिंगोणा येथील गणपत लटकन सैंदाणे हे कामानिमित्त तहसील कार्यालयाच्या परिसरात आल होते. यावेळी त्यांच्या पिशवितील मुदतठेव पावती हरवली. ही पावती दिनेश येवले यांना सापडली. त्यावरील लाखापेक्षा जास्त रकमेचा आकडा पाहून ती संबंधितांकडे पोचावी म्हणून ते शोध घेत होते. त्यांनी परिसरात याबाबत विचारपूस करू लागले. शोधाशोध करत असताना त्यांना सदाशिव सैंदाणे भेटले. अमळगावचे गणेश सैंदाणे यांनी कैलास सैंदाणे व दीपक खोंडे यांना कळविले. श्री. खोंडे व श्री. सैंदाणे यांनी सेवानिवृत्त मेजर विजय सूर्यवंशी यांचे नातलग असल्याचे सांगितले. त्यांनी गणपत सैंदाणे यांना बोलऊन श्री. येवले यांच्याकडे नेले. मुदतठेव पावतीवरील नावाची व्यक्ती तेच असल्याची खात्री केली. त्यानंतर ही पावती त्यांच्याकडे सुपूर्द केली. श्री. येवले यांच्या प्रामाणिकपणाचे अमळनेर नाभिक समाजाचे अध्यक्ष कैलास सैंदाणे, सदाशिव सैंदाणे, विजयराव सूर्यवंशी आणि दीपक खोंडे यांनी कौतुक केले.

दरम्यान तहसिल आवारासमोरील अनेक दुकांनामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. यामुळे नारिकांचे हरवलेले दस्तावेज आदी घटना उघडकीस येण्यास मदत होते.









# सौंदत्ती यल्लम्मा

य ल्लम्मा ही पतीतांची देवी म्हणून पूजली जाते. कर्नाटक, आंध्र प्रदेश, आणि महाराष्ट्रात माता यल्लम्मा देवीची मंदिरे आहेत. बेळगाव जिल्ह्यातील सौंदत्ती येथे यल्लम्मा देवीचे मंदिर आहे. बेळगावपासून सुमारे ८० कि. मी.वर डोंगराच्या माथ्यावर रेणुकामाता मंदिर आहे. या रेणुका मातेलाच ‘ यल्लम्मा देवी ’ असेही म्हणतात. दंतकथेनुसार रेणुका आणि जमदग्नी मुनी सध्याच्या बेळगाव जिल्ह्यात सौंदत्ती भागात असलेल्या रामशृंग पर्वतराजीमध्ये राहात होते. रेणुका पहाटे उठून मलप्रभा नदीवर स्नानासाठी जात असे. येताना मातीचा घट बनवून घटात पाणी आणत असे. त्या पाण्याने जमदग्नी मुनी स्नान वगैरे करायचे. हा नित्यक्रम अतिशय निग्रहाने माता करीत असे.

एके दिवशी रेणुका माता पाणी आणण्यासाठी नदीवर गेल्या. मातेने काही गंधर्व युगलांना जलक्रीडा करताना पाहिले. नकळतपणे मातेचे चित्त विचलित होऊन त्या स्वप्नात रममाण झाल्या. त्या जेव्हा भानावर आल्या तेव्हा त्यांना खूप पश्चात्ताप झाला. उशीर होतो आहे म्हणून त्या घट बनवायचा प्रयत्न करीत होत्या. परंतु चित्त ढळल्यामुळे त्या मातीचा घट बनवू शकल्या नाहीत. माता रिकाम्या हाताने परतलेल्या पाहून जमदग्नी मुनी अतिशय चिडले आणि मातेला दूर निघून जाण्यास सांगितले. विवश रेणुका माता अरण्यात जाऊन तप करू लागल्या. तीन दिवस शिवलिंगाची मनोभावे पूजा केल्यानंतर चार दिवसांनंतर त्या परत आल्या. जमदग्नी मुनींचा राग मावळला



नव्हता. रेणुका मातेला पाच पुत्र होते. पहिल्या चार पुत्रांना मातेला ठार मारण्यास सांगितले. परंतु चारही पुत्रांनी आज्ञा पाळली नाही. रागाने चारही पुत्रांना भस्म केले. हे पाहून माता रडू लागल्या. तेव्हा तेथे परशुराम ऋषी आले. मुनींनी झालेला प्रकार परशुरामांना सांगून आईचा शिरच्छेद करण्यास सांगितले. परशुरामांनी थोडा विचार केला. आपल्या वडिलांचा राग लक्षात घेऊन मातेचा शिरच्छेद केला. ते पाहून त्यांचा राग शांत झाला. त्यांनी परशुरामांना दोन वर मागण्यास सांगितले. तेव्हा परशुरामांनी एक आईचे प्राण आणि भावांचे प्राण परत मागितले. तसेच दुसरे आपण आपला राग कायमचा विसरून जावे, असे सांगितले.

असे सांगितले जाते, की जेव्हा परशुराम आईला ठार मारण्यासाठी तिच्याजवळ गेले तेव्हा माता घाबरून एका गरीब वस्तीमध्ये शिरली. रेणुका मातेचे प्राण वाचविण्यासाठी मधे आलेल्या गरीब महिलेचेही शीर धडावेगळे केले होते. जमदग्नी मुनींच्या वरामुळे रेणुका मातेला पुनरज्जीवित करताना चुकून गरीब महिलेच्या शरीरावर रेणुका मातेचे मस्तक ठेवले. त्यानंतर गरीब महिलेचे शीर लाभलेल्या रेणुका मातेला जमदग्नींची पत्नी म्हणून स्वीकारले. गरीब महिलेला समाजात यल्लम्मा देवी म्हणून पूजले जाऊ लागले. यल्लम्मा देवीची मंदिरे सौंदत्ती, मणूर आणि महाराष्ट्रात जत येथेही आहे. माहूरच्या रेणुका मातेलाही यल्लम्मा म्हटले जाते.

# श्री मंगळग्रह मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्तच्या दोन दिवसीय नवचंडी महायागाची सांगता

## पालखी पूजनासह महाआरतीवेळी फुलला भक्तीचा मळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षी नवचंडी महायागाचे आयोजन केले जाते. यंदाही दोन दिवसीय भव्य महायागाला सोमवार, दि. २९ सप्टेंबर रोजी अतिशय चैतन्य आणि भक्तिमय वातावरणात सुरूवात झाली.

मंगळवार, दि. ३० सप्टेंबर रोजी अतिशय भक्तिपूर्ण वातावरणात या दोन दिवसीय नवचंडी महायागाची सांगता झाली. पालखी पूजनासह महाआरतीवेळी श्री मंगळग्रह मंदिर परिसरात भक्तीचा मळा फुलल्याचे चित्र दिसून आले. या महायागाच्या पूजेसाठी दोन दिवसांकरिता एकूण २७ मानकरी सपत्नीक सहभागी झाले होते.

महायागाला मंगळवारी सकाळी ९ वाजता सुरूवात झाली. यात सर्व ९ मानकरी सपत्नीक पूजेसाठी उपस्थित होते. या मानकऱ्यांच्या हस्ते गणपती पूजन, देवतांचे प्रातःपूजन, उत्तरांग हवन, बलिदान व पूर्णाहुती करण्यात आली. त्यानंतर पालखी पूजन व महाआरती होऊन महायागाची सांगता झाली. विशेष म्हणजे आज नवरात्रोत्सवातील मंगळवार अर्थात नवमीचा प्रारंभ दिवस असल्याने मंदिर परिसरात होणाऱ्या विविध पूजा, अभिषेक आदींच्या दर्शनासाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

मंदिरातील मुख्य पुरोहित शुभम वैष्णव यांनी पौरोहित्य केले. त्यांना प्रसाद भंडारी, तुषार दीक्षित, जयेंद्र वैद्य, गणेश जोशी, वैभव लोकाक्षी, अक्षय जोशी, मंदार कुलकर्णी, हेमंत गोसावी, गोपाळ पाठक यांनी सहकार्य केले.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, सौ. आशाताई महाले, उज्ज्वलाताई शहा यांच्यासह मंदिर परिसरातील भाविक व मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महायागाचे मंगळवारचे मानकरी**
**श्री. प्रवीण श्रीराम पाटील, श्री. निरंजन रमेश पेंढारे, श्री. विजय शेखनाथ पाटील (झाडी), श्री. उमेश पोपट पाटील, श्री. नगराज पंडित पाटील, श्री. रवींद्र फुला देवरे सर, श्री. उमेश आत्माराम पाटील, सौ. दीपाली भाऊराव सोनवणे, श्री. हरिओम विनोद अग्रवाल.**



*अमळनेर :* नवचंडी महायागासाठी केलेली भव्य मांडणी.




*अमळनेर :* नवचंडी महायागाच्या पूर्णाहुतीप्रसंगी उपस्थित असलेले स्त्री-पुरुष भाविक. (छायाचित्रे : नितेश बारी)




*अमळनेर : संभाजी भिडे गुरूजी प्रणीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संचलित जय बजरंग मंडळ पानखिडकी यांच्या तर्फे धर्म जागृतीच्या उद्देशाने आयोजित ‘श्री दुर्गा माता दौड’ला सोमवारी पहाटे पाचला पानखिडकीपासून प्रारंभ झाला. तांबेपुरातील मारोती मंदिर, मिल चाळमधील श्री सप्तश्रृंगी माता मंदिर, हिंगलालज माता मंदिर, तांबेपुरातील श्री गणेश दुर्गामाता मंदिर येथे आरती झाली. यावेळी ‘दौड ’चे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. त्यानंतर ‘दौड ’ पानखिडकीतील दुर्गामाता मंदिराजवळ परतली.* (छायाचित्रे : नितेश बारी)

# महाकालीची विविध रूपे

‘ काली ’ या शब्दाचा अर्थ आहे ‘ काल ’. त्यांची पत्नी काल हे भगवान शंकराचे नाव आहे. म्हणूनच शिवपत्नीला ‘ काली ’ या नावाने ओळखले जाते. महाकालीला ‘ आध्य काली ’सुद्धा म्हणतात.

मार्कण्डेय पुराणानुसार दुर्गा सप्तशती खंडामध्ये भगवती अंबिकेच्या ललाटातून महाकालीची उत्पत्ती झाली, असे वर्णन आहे. भगवती कालीचे स्वरूप तिच्यापेक्षा विभिन्न आहे. भगवती अंबिकेच्या ललाटातून उत्पन्न झालेली काली दुर्गा त्रिमूर्तीमधील एक आहे. त्यांच्या ध्यानाचे स्वरूपही अध्य कालीच्या ध्यानापेक्षा खूप वेगळे आहे.

**तंत्रशास्त्रातील आद्य कालीची दहा रूपे**

१) काली २) तारा ३) षोडशी ४) भुवनेश्वरी ५) भैरवी ६) छिन्नमस्ता ७) धुमावती ८) बगला ९) मातंगी १०) कमलात्मिका मुळात भगवती कालीचेच रूप आहे. त्याचप्रमाणे सर्व देवी आणि योगिनी या सर्वांना भगवतीचेच प्रतिरूप मानले जाते.

**त्यांच्यातील आठ रूपे मुख्य मानली जातात.**

१) चिंतामणी काली २) स्पर्शमणी काली ३) संततीप्रदा काली ४) सिद्धी काली ५) दक्षिण काली ६) कामकला काली ७) हंस काली ८) गुह्य काली.

ही महाकाली भगवतीची आठ मुख्य रूपे मानली आहेत. त्याचप्रमाणे कालीकर्म दीक्षेमध्ये या देवीच्या आठ रूपांचे मंत्र दिलेले आहेत. त्यांच्याव्यतिरिक्त भद्रकाली, स्मशान काली आणि महाकाली ही देवीची तीन रूपेही विशेष प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे त्यांची उपासनाही विशिष्ट रूपाने केली जाते.

भगवती कालीच्या स्वरूपामध्ये दक्षिणकाली मुख्य देवी आहे. तिला दक्षिण कालिका या नावानेही ओळखले जाते.

काली उपासक सर्वांत जास्त दक्षिणकालीची उपासना करतात. गुह्यकाली, भद्रकाली, स्मशानकाली, महाकाली ही चार रूपे दक्षिण महाकालीचेच प्रतिरूप आहेत.

भगवती महाकालीला अनादिरूपा, अध्यरूपा, ब्रह्मस्वरूपिणी तथा कैवल्यदात्री या नावानेही ओळखल्या जातात.

दशमहाविद्यामधील देवी षोडशी जिला त्रिपुरसुंदरीही म्हटले जाते. भुवनेश्वरी आणि छिन्नमस्ता या देवी रजोगुण प्रदान करणाऱ्या आहेत. त्यांची सात्त्विक प्रकारे साधना केली जाते. या देवी आपल्यामध्ये सात्त्विकता निर्माण करतात. धुमावती, बगला, मातंगी, आणी कमलात्मिका या देवी तमोगुण प्रधान करणाऱ्या आहेत. त्यांची उपासना तंत्रशास्त्रातील षटकर्म करण्यासाठी करतात.


## श्रद्धा अन् इतिहासाचा संगम

# शिवहर्करे शक्तिपीठ

पाकिस्तानातील कराची शहराजवळील सिंध प्रांतात वसलेले ‘ शिवहर्करे शक्तिपीठ ’ हे हिंदू धर्मातील ५१ शक्तिपीठांपैकी एक आहे. हे शक्तिपीठ ‘ शिवहर्करा ’ या नावाने ओळखले जाते. विशेषत्वाने पाकिस्तानात त्याला अत्यंत पूजनीय मानले जाते.

पुराणकथेनुसार सतीदेवीने यज्ञकुंडात स्वतःला झोकून आत्मविसर्जन केले होते. भगवान विष्णूंनी त्यांच्या शरिराचे तुकडे करून विविध दिशांना फेकले. ज्या-ज्या ठिकाणी हे तुकडे पडले, ती ठिकाणे पुढे शक्तिपीठे म्हणून ओळखली जाऊ लागली. याच संदर्भात सतीदेवीचे तीन नेत्र (त्रिनेत्र) शिवहर्करे येथे पडली, अशी मान्यता आहे.

येथे देवी महिषासुरमर्दिनी या रूपात पूजली जाते. भैरवाचे रूप करोतेश्वर असे मानले जाते. देवीचा पराक्रमी व उग्र स्वरूपाचा अनुभव भक्तांना येथे मिळतो. त्यामुळेच हे शक्तिपीठ पराक्रम, धैर्य आणि संरक्षण यांचे प्रतीक मानले जाते. शिवहर्करे शक्तिपीठात दरवर्षी विविध धार्मिक उत्सव आणि यात्रांचे आयोजन केले जाते. विशेषतः नवरात्रीच्या काळात येथे मोठ्या संख्येने भाविक एकत्र येतात. पाकिस्तानातील हिंदू समाजासाठी हे ठिकाण आस्थेचे आणि आध्यात्मिक आधाराचे केंद्र आहे.निसर्गरम्य परिसर, प्राचीनता आणि देवीच्या कृपेने नटलेले शिवहर्करे शक्तिपीठ हे हिंदू धर्मातील एक महत्त्वाचे तीर्थस्थान आहे. भारतातील ज्या हिंदूंना या मंदिराची माहिती आहे तेही मोठ्या प्रमाणावर या मंदिरात दर्शनासाठी जातात. या देवीचे फोटो व मूर्ती भारत-पाकिस्तान सीमेजवळील हिंदूंच्या घरात मोठ्या प्रमाणात आढळतात.



# मध्य प्रदेशातील सिद्धपीठ : माता बगलामुखी

प्राचीन ग्रंथांत दहा महाविभूतींचा उल्लेख आलेला आहे. त्यातील एक म्हणजे बगलामुखी देवी. देवांची देवी म्हणून बगलामुखी देवीला महत्त्व प्राप्त झाले आहे. बगलामातेची देशात फक्त तीन ठिकाणीच प्राचीन मंदिरे आहेत. त्यांना सिद्धपीठ म्हटले जाते. दतिया (मध्य प्रदेश), कांगडा (हिमाचल) व नलखेडे (मध्य प्रदेश) येथे मातेची भव्य सिद्धपीठे आहेत. तिन्ही मातांचे वेगवेगळे महत्त्व आहे. तीन मुख असलेल्या त्रिशक्ती बगलामुखी देवीचे मंदिर मध्य प्रदेशातील नलखेडे येथे लखुंदर नदीकाठी स्थित आहे. द्वापारयुगातील हे मंदिर अत्यंत जागृत मानले जाते. त्यामुळे देशभरातील तांत्रिक-मांत्रिक, साधू-संत अनुष्ठान करण्यासाठी येथे जातात. मंदिरात बगलामुखी देवीव्यतिरिक्त लक्ष्मी, श्रीकृष्ण, हनुमान, भैरवनाथ व सरस्वतीच्या मूर्ती येथे आहेत. महाभारतात विजय मिळविल्यानंतर भगवान श्रीकृष्णाच्या आदेशाने महाराज युधिष्ठीर यांनी या मंदिराची स्थापना केली होती.

बगलामुखी देवीची मूर्ती स्वयंभू असल्याचीही आख्यायिका आहे. बगलामुखी मातेचे हे खूप प्राचीन मंदिर आहे. दहा पिढ्यांपासून येथे पूजापाठ होत आहेत. १८१५ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. भाविक मनोकामना पूर्ण करण्यासाठी येथे जातात. हे मंदिर स्मशानभूमीत आहे. बगलामुखी देवी विशेषत्वाने तांत्रिक आणि मांत्रिकांची देवी आहे. त्यामुळे येथे तांत्रिक अनुष्ठानाला अधिक महत्त्व आहे. संपूर्ण विश्वात मातेची तीन मंदिरे आहेत. परंतु येथील मंदिराचे महत्त्व काही वेगळे आहे. त्याचे कारण म्हणजे येथील मातेची मूर्ती स्वयंभू आहे. मंदिरात बेलपत्र, चमेली, आवळा, लिंब व पिंपळाचे झाड आहे. मंदिर परिसरात सुंदर बाग आहे. नवरात्रोत्सवात येथे भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होते. मात्र, परमसात्त्विक स्वभावगुणाचे भाविक सदर मंदिर स्मशानभूमीत असल्याने तेथे जाणे टाळतात.

### बगलामुखी मंदिरात कसे जाल?

**हवाई मार्ग :** नलखेडे येथे जाण्यासाठी विमानाने इंदूरला जावे लागते. नलखेड्यापासून जवळचा एअरपोर्ट इंदूरच आहे.

**रेल्वे मार्ग :** इंदूर येथे रेल्वेस्थानक आहे. तेथून देवास किंवा उज्जैन येथे जाण्यासाठी रेल्वे मिळते. देवास किंवा उज्जैन येथून नलखेडे (जि. शाजापूर-मध्य प्रदेश) येथे बस किंवा खासगी वाहनाने जाता येते.

**महामार्ग :** इंदूर येथून साधारण १६५ किलोमीटरवरील नलखेडे या गावासाठी बस मिळते. तसेच देवास व उज्जैन येथूनही बगलामुखी मातेच्या मंदिरात जाण्यासाठी खासगी वाहने उपलब्ध होतात.





# तिरूपती देवस्थानकडून कोल्हापूरच्या अंबाबाईला मानाचा शालू

तिरूपतीस्थित भगवान बालाजीला दोन पत्नी आहेत. त्यापैकी एका पत्नीचे अर्थात पद्मावती मातेचे मंदिर तिरूपतीला आहे. तर दुसरी पत्नी माता महालक्ष्मी अर्थात अंबाबाईचे मंदिर कोल्हापूरला आहे. दर नवरात्रोत्सवात अंबाबाईसाठी तिरूमला तिरूपती देवस्थानकडून मानाचा शालू अर्पण केला जातो. शारदीय नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेला श्रीअंबाबाईची त्रिपुरसुंदरी देवीच्या रूपात पूजा बांधण्यात येते. जुना राजवाड्यातील श्री तुळजाभवानी देवीची फलाहार करत असलेल्या रूपातील पूजा बांधली जाते. नवरात्रोत्सवात आदिशक्तिपीठ म्हणून आई दुपारी बाराच्या आरतीनंतर त्रिपुरसुंदरीच्या रूपात सालंकृत पूजा बांधण्यात येते. उगवत्या सूर्याप्रमाणे जिचा वर्ण आहे, जिने आपल्या हातामध्ये पाश-अंकुश-पंचबाण व उसाचा धनुष्य धारण केला आहे, असे या देवीचे स्वरूप असते. पूर्वी भंडासुराच्या अत्याचाराला त्रासलेल्या आणि स्वर्गादी स्वस्थानापासून वंचित झालेल्या देवतांनी, महर्षी नारदांच्या उपदेशानुसार श्रीमहात्रिपुरसुंदरी देवीची घोर तपश्चर्या आरंभली. यामध्ये देवीस उद्देशून देवगण ‘ महायाग ’ करू लागले. यावेळी प्रसन्न होऊन देवी माघी पौर्णिमेस अग्निकुंडातून प्रगट झाली. ही दशमहाविद्येतील तिसरी देवता असून, ‘ ललितेश्वर ’ हे तिचे भैरव आहेत. ही श्रीकुलप्रमुख असणारी देवता, पूर्वाम्नायपीठस्था आहे. बाला त्रिपुरसुंदरी, महात्रिपुरसुंदरी, श्रीषोडशीललिता, राजराजेश्वरी, त्रिपुरा, सुभगा, कामेश्वर हिचे उपासनाभेद व प्रकार आहेत. साक्षात शिव, कुबेर, अग्नी, सूर्य, दुर्वास, गुरुदत्त, परशुराम इत्यादी अंबामातेचे उपासक आहेत.